महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक : सीटीआर-३५२२/प्र.क्र.१२१/२०२२/जाहिरात दिनांक : ०२ जानेवारी, २०२५

## -: शुद्धिपत्रक :-

## रेशीम विकास अधिकारी, राज्य रेशीम सेवा, श्रेणी-१, गट-ब, रेशीम संचालनालय

## जाहिरात क्रमांक: ००९/२०२३

शासनाच्या सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागातील रेशीम संचालनालयामार्फत **रेशीम विकास अधिकारी, राज्य रेशीम सेवा, श्रेणी-१, गट-ब** या संवर्गातील पद भरती करीता आयोगामार्फत दिनांक २४ फेब्रुवारी, २०२३ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. दरम्यानच्या काळात महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरीता आरक्षण अधिनियम २०२४, दिनांक २६ फेब्रुवारी, २०२४ अनुसार राज्याच्या नियंत्रणाखालील पदांवरील नियुक्तीकरीता सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरीता आरक्षणाची तरतूद विहित करण्यात आली असून सदर अधिनियमातील तरतुदी शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी २०२४/प्र.क्र.७५/१६-क, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२४ अनुसार प्रस्तुत संवर्गाच्या विज्ञापित जाहिरातीकरीता लागू आहेत. प्रस्तुत प्रकरणी सामाजिक व शैक्षणिक शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरीता आरक्षण निश्चिती करून सुधारित मागणीपत्र पाठविण्याबाबत शासनास कळविण्यात आले होते. त्यास अनुसरून शासनाद्वारे सुधारित मागणीपत्र पाठविले आहे. त्यानुसार संबंधित जाहिरातीमधील पदांचा सामाजिक / समांतर आरक्षणाचा तपशील खालीलप्रमाणे राहील:-

**२. उपलब्ध पदसंख्या:- ०४**

**२.१ भरावयाच्या पदांचा सामाजिक/समांतर आरक्षणाबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-**

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | सा. व शै. मा. वर्ग | आ.दु.घ | एकूण आरक्षित | अराखीव (खुला) | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकुण पदे | -- | ०१ | -- | -- | -- | ०१ | -- | ०१ | ०१ | -- | ०४ | -- | ०४ |
| सर्वसाधारण | -- | ०१ | -- | -- | -- | ०१ | -- | ०१ | ०१ | -- | ०४ | -- | ०४ |
| महिला | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| अनाथ | -- | | | | | | | | | | | | |
| दिव्यांग | -- | | | | | | | | | | | | |

**३.** शासनाने पाठविलेल्या सुधारित मागणीपत्रानुसार मूळ जाहिरातीत दर्शविलेल्या अनुसूचित जाती वर्गवारीची पदे रद्द झाली असल्याने अनुसूचित जाती वर्गवारीसाठी अर्ज केलेल्या उमेदवारांचा संबंधित जाहिरातीसाठी विचार करण्यात येणार नाही.

**४.** सुधारित मागणीपत्रानुसार भटक्या जमाती (ड) करीता ०१ पद आरक्षित दर्शविण्यात आले आहे. विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क) व भटक्या जमाती (ड) प्रवर्गासाठी आरक्षित असलेली पदे आंतरपरिवर्तनीय असून आरक्षित पदासाठी संबंधित प्रवर्गातील योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास अद्ययावत शासन धोरणाप्रमाणे उपलब्ध प्रवर्गातील उमेदवाराचा विचार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल. याबाबत पात्र उमेदवारांकडून नव्याने अर्ज मागविण्यात येत आहेत.

**५.** काही उमेदवारांनी त्यांच्याकडील कुणबी नोंदीच्या आधारे इतर मागास वर्गाचे प्रमाणपत्र मिळाल्याचे नमूद करुन इतर मागास वर्गाचा विकल्प सादर करण्याची संधी देण्याबाबत विनंती केली होती. त्यास अनुसरुन शासन पत्र, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : संकीर्ण २०२४ / प्र.क्र.१३७ / आरक्षण-०५, दिनांक २८ मे, २०२४ अन्वये प्राप्त अभिप्रायानुसार अराखीव किंवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) प्रवर्गातून उमेदवारांनी इतर मागास वर्गाचे (OBC) जात प्रमाणपत्र प्राप्त केले असल्यास, अशा उमेदवारांना इतर मागास वर्गाचा (OBC) दावा उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार ज्या उमेदवारांनी इतर मागास वर्गाचे (OBC) जात प्रमाणपत्र प्राप्त केले आहे, अशा उमेदवारांकडून नव्याने अर्ज मागविण्यात येत आहेत.

**६....**

**६.** आयोगाकडून प्रसिद्ध करण्यात आलेल्या प्रस्तुत जाहिरातींकरीता अर्जाद्वारे विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), इतर मागासवर्ग आणि सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाचा दावा करण्याकरीता नव्याने अर्ज सादर करण्यासंदर्भात खालीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे :-

सदर शुध्दीपत्रकास अनुसरून नव्याने पात्र ठरणारे उमेदवार ऑनलाईन अर्जप्रणालीमधील उमेदवारांच्या प्रोफाईल मधील My Account सदराखाली प्रस्तुत परीक्षेच्या जाहिरातीकरीता उपलब्ध करून देण्यात आलेल्या Link च्या आधारे उपरोक्त नमूद प्रवर्गातून अर्ज सादर करू शकतील.

| अ.क्र. | तपशील | विहित कालावधी |
|---|---|---|
| १ | अर्ज सादर करावयाचा कालावधी | दिनांक ०६ जानेवारी, २०२५ रोजी १४.०० ते<br>दिनांक २० जानेवारी, २०२५ रोजी २३.५९ |
| २ | ऑनलाईन पध्दतीने विहित परीक्षा शुल्क भरण्याकरीता अंतिम दिनांक | दिनांक २० जानेवारी, २०२५ रोजी २३.५९ |
| ३ | भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्यासाठी चलनाची प्रत घेण्याचा दिनांक | दिनांक २१ जानेवारी, २०२५ रोजी २३.५९ |
| ४ | चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरण्याचा अंतिम दिनांक | दिनांक २२ जानेवारी, २०२५ रोजी बँकेच्या कार्यालयीन वेळेमध्ये |

**७.** कमाल वयोमर्यादा गणण्याचा दिनांक व शैक्षणिक अर्हता तसेच अनुभव गणण्याचा कालावधी हा मूळ जाहिरातीमध्ये नमूद दिनांकानुसारच गणण्यात येईल.

**८.** **रेशीम विकास अधिकारी, श्रेणी-१, गट-ब (जाहिरात क्रमांक ००९/२०२३)** करीता कमाल वयोमर्यादा **दिनांक ०१ जून, २०२३** व शैक्षणिक अर्हता व अनुभव गणण्याचा **दिनांक २० मार्च, २०२३ ( मूळ जाहिरातीमधील अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांक)** असा राहील.

**९.** **रेशीम विकास अधिकारी, श्रेणी-१, गट-ब (जाहिरात क्रमांक ००९/२०२३)** करीता विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), इतर मागास वर्ग आणि सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाचा दावा करण्यासाठी नव्याने अर्ज सादर करणाऱ्या उमेदवारांचे जात प्रमाणपत्र सदर शुद्धीपत्रकाच्या विहित अंतिम दिनांकापूर्वीचे म्हणजेच **दिनांक २० जानेवारी, २०२५** पूर्वीचे असणे आवश्यक आहे.

**१०.** प्रस्तुत संवर्गाकरीता इतर मागास वर्ग, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाचा दावा करणाऱ्या तसेच नव्याने अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी सन २०२३-२०२४ अथवा २०२४-२०२५ या आर्थिक वर्षात वैध असणारे उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (NCL) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

**११.** उपरोक्त कार्यपद्धती सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाच्या आरक्षणाच्या अनुषंगाने **मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल रिट याचिका क्रमांक ३४६८/२०२४ तसेच त्याअनुषंगिक इतर याचिकांवरील अंतिम निर्णयाच्या अधीन राहील.** **रेशीम विकास अधिकारी, श्रेणी-१, गट-ब (जाहिरात क्रमांक ००९/२०२३)** च्या मूळ जाहिरातीस आयोगाच्या दिनांक २६ एप्रिल, २०२४ रोजीच्या प्रसिद्धीपत्रकातील तरतुदी लागू राहतील.

**१२.** दिनांक २४ फेब्रुवारी, २०२३ रोजी प्रसिद्ध मूळ जाहिरातीमधील इतर अटी व शर्तींमध्ये कोणताही बदल नाही.

उप सचिव, (जाहिरात)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण : नवी मुंबई.